# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करण्याबाबत**

**(१) ६६७३७ (१७-१२-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याचे २ जिल्हे होऊन पालघर हा नविन जिल्हा होऊन त्याठिकाणी विविध कार्यालये सुरू झाली. परंतु जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अदयापी विभाजन झालेले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बँकेच्या जव्हार, मोखाडा, वाडा येथील विविध शाखांमध्ये मोठ्या प्रमाणात कर्मचारी, सोनार व बँकेच्या संचालकांच्या संगनमताने बनावट (खोटे) सोने तारण ठेवून लाखो रूपयांची बँकेची फसवणूक केलेली असून बँकेच्या अध्यक्षांचे नातेवाईक, बँक संचालक यांनी डोंबिवली व कल्याण मोटार सायकल व शेकडो दुचाकी वाहनांची प्रत्यक्ष खरेदी न करता मोठया प्रमाणात बोगस लाभार्थींना कर्जवाटप केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बँकेतील ७५ सुरक्षारक्षकांची भरतीदेखील शासनाची परवानगी न घेता व कोणत्याही वृत्तपत्रात जाहिरात न देता केली असून हार्डडिस्क व सॉफ्टवेअर खरेदीत मोठा गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार सदर प्रकरणातील दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची व बँकेच्या विभाजनाचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, ?

**श्री. सुभाष देशमुख (०६-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) i) (अ) बनावट सोने तारण व वाहन कर्ज वाटप प्रकरणी फौजदारी/दिवाणी स्वरूपाची कारवाई बँकेमार्फत करण्यात आली आहे.

ii) बँकेच्या मोखाडा शाखेतील सोने तारण कर्ज फसवणूकीबाबत बँकेच्या वतीने संबंधित कर्जदार, बँकेचे सोनार, शाखा व्यवस्थापक, शाखा हिशोबनीस यांच्या विरूध्द दिनांक २८/०४/२०१६ रोजी एफ.आय.आर. क्र. I २१ दाखल केला आहे. या प्रकरणात १९ कर्जदार, १ सोनार व २ बँकेचे अधिकारी अशा एकूण २२ आरोपींचा समावेश आहे.

iii) लोढा हेवन (शिळफाटा) शाखेतील वाहन कर्ज फसवणूक प्रकरणाबाबत शिळ डायघर पोलीस स्टेशनमध्ये संबंधित कर्जदार, जामिनदार, वाहन डिलर यांचे विरोधात एफ.आय.आर. क्र. I ६१/२०१६ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पोलीस तपास पूर्ण होऊन ठाणे फौजदारी न्यायालयात संबंधितांविरूध्द फौजदारी दावा क्र.८४५/१६ चालू आहे.

iv) डोंबिवली (प.) शाखेतील वाहन कर्ज फसवणूक प्रकरणाबाबत संबंधित कर्जदार, त्यांचे जामिनदार आणि डिलर्स व त्यांचे साथिदार यांनी एकाच पध्दतीने एकाच तंत्राचा अवलंब करून खोटी व बनावट कागदपत्रे तयार करून प्रत्यक्षात वाहन खरेदी न करता बँकेची दिशाभुल करून एकूण ५ वाहन कर्ज प्रकरणे दाखल करून बँकेची रू.६४ लाख ६४ हजार एवढ्या रकमेची फसवणूक केल्याबाबत त्यांचेविरूध्द डोंबिवली (प.) येथे एफ.आय.आर. क्र. ४०/१६, दिनांक १२/०३/२०१६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आर्थिक गुन्हे शाखा ठाणे यांच्यामार्फत तपासाचे काम चालू आहे.

v) डोंबिवली (पू.) शाखेतील एकूण २५ वाहन कर्ज प्रकरणी वाहन डिलर, कर्जदार व जामिनदार यांचेविरूध्द बँकेस बोगस कागदपत्रे सादर करून संगनमताने बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा क्रमांक ६५/१६, दिनांक १६/०३/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण पुढील कार्यवाहीकरीता आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्याकडे सोपविण्यात आलेले आहे.

लोढा हेवन (शिळफाटा), डोंबिवली (प.) व (पू.) या शाखेतील वाहन कर्ज फसवणूक प्रकरणात फसवणूक झालेल्या रकमा वसूल करण्याकरीता बँकेने दि ओरिएंटल इन्श्युरन्स कंपनीकडे दिनांक २६/०४/२०१६ रोजी क्लेम सादर केला असून त्याचा पाठपुरावा चालू आहे. तसेच बँक कर्ज वसुलीबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १०१ (१) अंतर्गत संबंधित कर्जदार व जामिनदार यांच्यावर वसूली प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. पुढील कार्यवाही चालू आहे.

(ब) सहकार आयुक्तांनी दिनांक ०९/०५/२०१८ च्या पत्रान्वये बँकेची दिनांक ३१/०३/२०१८ अखेरची आर्थिक पत्रके बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकाकडून तपासून घेऊन बँकेच्या संचालक मंडळाच्या ठरावासह बँक विभाजनाचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासी विभागाकडे सुमारे अडीचशे कोटी वापराविना पडून असल्याबाबत**

**(२) ६८९५७ (२७-०१-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विभागाकडे सुमारे अडीचशे कोटी वापराविना पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर वापराविना पडून असलेल्या निधीचा वापर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-११-२०१८) :** (१), (२) व (३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात माहे सप्टेंबर अखेर वित्त विभागामार्फत आदिवासी विकास विभागास केंद्र व राज्य योजनांर्गत एकूण अर्थसंकल्पित रु.८०५१.४६२ कोटी पैकी रु.७७२५.६६६ कोटी इतका निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर या विभागास वितरीत करण्यात आलेला होता. उर्वरित तरतुद ही प्रामुख्याने Shadow स्वरुपाची असून केंद्राकडून केंद्र हिस्सा प्रत्यक्षात प्राप्त झाल्यानंतर वितरीत करण्यात येत असल्याने रु.३२५.७९६ कोटी इतकी तरतुद वितरीत करण्यात आली नव्हती.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिरोंचा (जि.गडचिरोली) येथील शासकीय आश्रमशाळेत मुख्याध्यापकाची नियुक्ती करण्याबाबत**

**(३) ७८७४८ (२८-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली येथील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्यावतीने सिरोंचा येथे कोटयवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या शासकीय आश्रमशाळेत मुख्याध्यापकाची नियुक्ती अद्‌याप करण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी आदिवासी विकास विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने पालक वर्गामध्ये असंतोष असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) तदनुसार, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) सिरोंचा येथील शाळेत प्राथमिक मुख्यध्यापकाचे पद मंजूर नाही. सद्यस्थितीत सिरोंचा येथील शाळेच्या मुख्याध्यापक पदाचा कार्यभार तेथील जेष्ठ प्राथमिक शिक्षकाकडे सोपविण्यात आला आहे. तसेच शाळेतील शिक्षक व अधिक्षकांची सर्व पदे भरण्यात आली आहेत.

---

## जिल्हा निबंधक तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलढाणा यांनी निवडणूक खर्चात केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४) ८६६४४ (०४-०९-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा निबंधक तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलढाणा श्री.एन.डी.करे यांनी निवडणूक खर्चात केलेल्या कोट्यवधी रूपयांच्या गैरव्यवहाराबाबतची सखोल चौकशी करण्याकरीता नेमण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(३) तसेच अहवालात दोषी आढळून आलेल्या व्यक्तींविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१८) :** (१) होय.

(२) सदर अहवालात श्री. एन.डी.करे, तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे नियंत्रणामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर आलेला खर्च हा अवास्तव केला असून श्री. करे यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार खरेदी विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (अ) (१) (ओ) व १४ (अ) (५) च्या तरतूदींचे उल्लंघन केले असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(३) श्री.एन.डी.करे, तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बुलढाणा तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ अंतर्गत शिस्तभंगविषयक कारवाई आदेशित करण्यात आली असून दिनांक १७/४/२०१८ च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयातील रिक्त पदांबाबत

**(५) ९०९१४ (०९-०८-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयातील अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे जातपडताळणीची कामे विलंबाने होत असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समिती कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच रिक्त पदे किती कालावधीत भरण्यात येणार आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-११-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयातील वर्ग -१ च्या १० पदांपैकी ८ पदे भरण्यात आली आहेत. तसेच वर्ग -२ च्या ४ पदांपैकी २ पदे आणि वर्ग ३ च्या २० पदांपैकी १६ पदे भरण्यात आली आहे व वर्ग ४ ची सर्व पदे भरलेली आहेत. अशाप्रकारे एकूण ३५ पदांपैकी २७ पदे भरण्यात आली आहेत.

---

**राज्यातील उद्योग आर्थिक संकटामुळे बंद पडत असल्याबाबत.**

**(६) ९५५५२ (१३-०७-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योग क्षेत्र आर्थिक संकटात असून बाजारातील तीव्र स्पर्धा, आर्थिक मंदी, शासनाच्या जाचक अटी व शर्ती, बँकाची कर्जे, नोटाबंदी, तंत्रज्ञानाचा अभाव अशा अनेक कारणामुळे उद्योग, विशेषत: छोटे उद्योग बंद पडत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजारी उद्योगांच्या पुनरुज्जीवनाबाबत शासनाकडे ठोस उपाययोजना अथवा धोरण नसल्यामुळे बेरोजगारी वाढत आहे तसेच उद्योग विभागाच्या विकास आयुक्तालयाच्या माहितीनुसार राज्यात सुमारे ५२ टक्के उद्योग विविध कारणामुळे बंद आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.उद्योग मंत्री यांना पत्र पाठवून उद्योग व्यवसायाला पोषक वातावरण तयार करण्यासंदर्भात विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उद्योग बंद पडण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, त्यानुसार उद्योगांना विशेषत: लघुउद्योगांना संजिवनी देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच राज्यातील बंद उद्योगाच्या जागा नवीन कंपनीला देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील एकूण १,५१,०१९ सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांपैकी अखिल भारतीय चौथ्या प्रगणनेनुसार ३७,७५३ इतके उद्योग घटक बंद आढळलेले आहेत.

(३) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योगमंत्री यांना पत्र पाठवून उद्योग व्यवसायाला पोषक वातावरण तयार करण्यासंदर्भात विनंती केली आहे.

(४) उद्योग घटक बंद होण्याची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत.

अ) मालकी हक्कातील अंतर्गत कलह.

ब) बाजारपेठेतील उत्पादनात पर्यायी स्वस्त उत्पादनांची उपलब्धता.

क) अपुरा वित्त पुरवठा ( खेळते भांडवल )

ड) उद्योगातील भाग भांडवलाचा उद्योगाव्यतिरिक्त अन्य अनुत्पादक कारणाकरिता वापर, इ.

आजारी उद्योगांच्या पुर्नवसनासाठी राज्य शासनाकडून खालीलप्रमाणे सोयी व सवलती देण्यात येतात :-

अ) राज्यातील सर्व भागातील आजारी उद्योगांचे पुर्नवसनासाठी शुश्रूषा दिनांकापर्यंतची सर्व शासकीय थकबाकीची ( उदा. विक्रीकर -मूल्यवर्धित कर, खरेदी कर, अतिरिक्त कर, जमीन महसूल, टर्नोवर कर, विद्युत कर, सिंचन कर, इ.) वसूली ७ टक्के व्याज आकारुन समान ६० मासिक हप्त्यामध्ये करण्यात येते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत आयुक्त (सहकार) यांचेकडे नोंदणीकृत आलेल्या उद्योगांनाही लागू राहील.

ब) सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पात्रता प्रमाणपत्र घेतलेल्या उद्योग घटक आजारी प्रमाणपत्र धारक असतील तर अशा घटकांना शासनाकडून दिले जाणारे अनुदान प्रा०धान्याने वितरित करण्यात येते.

क) एमआयडीसी किंवा सहकारी औद्योगिक वसाहतीतील बाहेरील आजारी उद्योगांना बाहेर पडण्यासाठी व त्यासाठी उद्योगांना स्थिर मालमत्ता विकण्यास परवानगी देण्यात येईल. परंतु सदर जागा ही यापुढे अनुक्रमे स्थानिक विकास नियमानुसार औद्योगिक किंवा सेवा उद्योग या कारणासाठी वापरण्यात यावी. परंतु त्या जागेचा वापर हा स्थानिक विकास आराखडयानुसार असलेल्या झोन प्रमाणेच त्याचा पुर्नवापर करण्यात यावा या अटीवर मालमत्ता विकण्यास परवानगी देण्यात येते. मात्र नवीन मालकाने अगोदरच्या घटकाची दायित्वे स्विकारणे बंधनकारक आहे.

राज्याचे औद्योगिक धोरण (२०१८) यामध्ये आजारी उद्योगांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) लागू नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील शिरोली औद्योगिक वसाहतीमधील सँड रिक्लमेशन प्लँट निधी अभावी अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(७) ९७९९५ (०३-०१-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शिरोली औद्योगिक वसाहतीमधील फॉड्री क्लस्टरच्या महत्वाकांक्षी प्रकल्पातील सँड रिक्लमेशन प्लँट निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (०३-११-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकल्प मे-जून २०१७ पासून कार्यान्वित झाला असून पूर्णपणे व्यवस्थित व सुस्थितीत सुरु आहे.

---

**राज्यात रोजगार उपलब्धततेचे प्रमाण वाढण्याबाबत.**

**(८) १०४०७५ (१३-०७-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'मेक इन महाराष्ट्र' या कार्यक्रमाचे सुरुवात झाल्यानंतर शासनाने महाराष्ट्रात मोठी उद्योगक्रांती होणार असल्याचा प्रसार करत ८० लाख लघुउद्योजकांसोबत करार करण्यात येऊनही मुंबईची उद्योग नोंदणी व रोजगार निर्मितीत अल्प प्रमाणात नोंदणी झाली असून नागपूर जिल्ह्यात सन २०१५-१६ यावर्षात केवळ १२ उद्योजकांची नोंदणी झाल्याचे माहितीच्या अधिकारात मागितलेल्या माहितीमध्ये माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उद्योग उभारणीत व रोजगार निर्मितीत घट होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुषंगाने उद्योगवाढीसाठी व रोजगार वाढीसाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मेक इन महाराष्ट्र-२०१६ या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत एकूण ३३८ सामंजस्य करार करण्यात आले असून, नागपूर जिल्हयामध्ये ४९ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच सदर कार्यक्रमामध्ये उद्योग संचालनालय, मुंबई यांचेमार्फत एकूण २५१२ सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातील प्रस्तावित गुंतवणुक रु.२८,८६९.१२ कोटी व १,७७,८४५ इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. त्यापैकी १,०५६ घटक कार्यान्वित झाले असून, त्यात रु.९,००५.०० कोटी गुंतवणुक व ५८,४३९ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

यामध्ये नागपूर जिल्हयात एकूण २७४ सामंजस्य करार करण्यात आलेले असून, त्यापैकी १५४ घटक कार्यान्वित झालेले आहेत. व यामध्ये रु.८३३ कोटी गुंतवणुक व ५८५८ इतका रोजगार उपलब्ध झालेला आहे.उर्वरित प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मेक इन इंडियाच्या माध्यमातून गुंतणूवकीचे प्रमाण वाढण्याबाबत.**

**(९) १०५६५७ (०४-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य)** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मेक इन इंडियाच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रात ११ लाख ३७ हजार ७८३ कोटींची गुंतवणूक होणार असली तरी प्रत्यक्षात मात्र सदर गुंतवणुक २ लाख ६९ हजार ८१० कोटींवर पोहोचली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, नोटाबंदी आणि जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर उद्योगांच्या संख्येत साडेपाचशेने घट झाली आहे आणि गुंतवणुकीचे प्रमाण साडेसात टक्क्यांवरुन ६.७ टक्क्यांवर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी नव्या उद्योगांची उभारणी करणे तसेच गुंतवणूक वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-११-२०१८) :** (१) मेक इन इंडिया सप्ताह दरम्यान उद्योग विभागाशी निगडीत एकूण २८५० सामंजस्य करार झाले व त्याव्दारे एकूण ३.९३ लक्ष कोटी गुंतवणुक अपेक्षित होती. त्यापैकी २३२० सामंजस्य करार केलेले उद्योग प्रगतीच्या विविध टप्प्यात आहेत. त्याव्दारे ३ लक्ष ८३ हजार कोटींची गुंतवणुक प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नविन उद्योग आकर्षित करण्यासाठी सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ च्या माध्यामातून उद्योगांना तालुका गटाच्या वर्गवारी प्रमाणे विविध प्रोत्साहने देण्यात येत आहेत. राज्यात विविध उद्योग आकर्षित करण्यासाठी उद्योग क्षेत्र निहाय विशेष धोरण आखुन त्यांना विशेष प्रोत्साहने देवू केली आहेत. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान धोरण, इलेक्ट्रॉनिक्स व फॅब धोरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अ.जा. व अ.ज. विशेष प्रोत्साहन योजना व नुकतेच महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण विहीत करुन उद्योगांना पोषक वातावरण तयार करण्यात येत आहे.

तसेच मेक इन महाराष्ट्र व Ease of Doing Business उपक्रमाच्या माध्यमातून उद्योगांसाठी विविध सुधारणा केल्या आहेत.

मैत्री कक्षा मार्फत उद्योगांना आवश्यक सुविधा व नाहरकती/परवाने सुलभ व जलद रित्या देण्यासाठी ऑनलाईन एक खिडकी प्रणाली व्दारे विविध सेवा देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चेहेडी शिवारात (ता.निफाड, जि.नाशिक) रोहित्र दुरुस्तीबाबत महावितरणकडे पाठपुरावा करुनही कार्यवाही न झाल्याबाबत**

**(१०) १०६०२१ (०४-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेहेडी शिवारात (ता.निफाड, जि.नाशिक) रोहित्रामध्ये शॉर्टसर्कीटमुळे आग लागून साडेतीन एकर ऊस जळाल्याची घटना दि.१९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,ऊस जळालेल्या शेतातील रोहित्र दुरुस्तीबाबत ग्रामपंचायतीने महावितरणकडे पाठपुरावा करुनही महावितरणने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नुकसानीला जबाबदार असणा-यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत व नुकसानाग्रस्त शेतक-याला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

दिनांक १७.१२.२०१७ रोजी चेहेडी शिवारात शॉर्टसर्किटमुळे आग लागून साडेतीन एकर ऊस जळाल्याची घटना घडली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर ग्रामपंचायतीने संबंधित रोहित्राबाबत कोणत्याही प्रकारची लेखी अथवा तोंडी सूचना महावितरणच्या संबंधित कार्यालयाकडे केलेली नाही.

(३) सदर जळीत प्रकरणांची चौकशी विद्युत निरीक्षक, नाशिक कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे. सदर जळीत प्रकरणास महावितरण कंपनी जबाबदार असल्याचे आढळून आल्यामुळे वीजसंच मांडणीतील त्रुटींचे निवारण करण्यासाठी व नुकसान भरपाई देण्याबाबत सदर कार्यालयाकडून कार्यकारी अभियंता, नाशिक ग्रामीण विभाग, महावितरण कंपनी यांना दि. २०.०१.२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्याकडून नुकसान भरपाई मिळण्यासाठी कागदपत्रे महावितरण कंपनीस प्राप्त झाली असून संबंधित कृषी अधिकारी यांच्याकडून अद्याप दाखला प्राप्त झालेला नाही.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) आदिवासी प्रकल्प विभागात**
**सुमारे ३२० पदे रिक्त असल्याबाबत**

**(११) १०६२६४ (०४-०४-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) आदिवासी प्रकल्प विभागात सुमारे ३२० पदे रिक्त असल्याने आदिवासींसाठी योजना राबविताना विलंब होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ३२० पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
पांढरकवडा आदिवासी विकास प्रकल्प कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत १०० पदे रिक्त आहेत.
(२) व (३) विद्यार्थी संख्या अभावी काही आश्रमशाळा बंद झाल्या आहेत. त्यामुळे तेथील पदांचे समायोजन अन्य आश्रमशाळेत करण्याची कार्यवाही सुरु होती. अपर आयुक्त, अमरावती कार्यक्षेत्रातील अनुसूचीत क्षेत्रातील शिक्षक संवर्गाची ४९ व शिक्षकेतर ६ असे एकूण ५५ पदे भरण्यासाठी जाहीरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच पदोन्नतीची व प्रतिनियुक्तीची पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाघुंडे बुद्रक (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या मैदानावरील**
**रोहित्रामधील विदयुत वाहक तारा असंरक्षित असल्याबाबत**

**(१२) १०६३६६ (०४-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघुंडे बुद्रक (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या मैदानावरील रोहित्रांमधील विदयुत वाहक तारा असून ज्या खोक्यात रोहीत्र आहे त्याचे दार कायम उघडे असल्याने विद्यार्थ्यांच्या जिविताला धोका निर्माण झाल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पालकांनी महावितरणकडे याबाबत वारंवार तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही होत नसल्याने मुलांना शाळेत न पाठविण्याचा निर्णय पालकांनी घेतल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित रोहित्र स्थलांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,तसेच या प्रकरणी तातडीने कार्यवाही न करणाऱ्या संबधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरणकडे दि.१२.०१.२०१८ रोजीचा तक्रार अर्ज प्राप्त आहे. सदर अर्जामध्ये मुलांना शाळेत न पाठविण्याचा निर्णय पालकांनी घेतल्याबाबतचा उल्लेख नाही..

(३) महावितरणच्या स्थानिक कार्यालयास दि.१२.०१.२०१८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जामध्ये रोहित्र स्थलांतरीत करण्याची मागणी केली होती. परंतु दिनांक २७.१०.२०१७ च्या पत्रान्वये रोहित्र स्थलांतरीत करण्याबाबतचे अंदाजपत्रक जिल्हा नियोजन अधिकारी, अहमदनगर यांना प्रशासकीय मान्यता व निधी हस्तांतरीत करण्याकरिता महावितरणमार्फत सादर करण्यात आले आहे. तसेच रोहित्राच्या खोक्याच्या दाराची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे लघुदाब वाहिनीच्या तारा ओढून घेण्यात आल्या आहेत. तसेच त्यामध्ये स्पेसर्स बसविण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम (ता.मालेगाव) जिल्हयातील हायड्रोकार्बनचा साठा असल्याची शक्यता तपासण्याच्या मोहिमेमध्ये बाधीत होणा-या शेतक-यांना मोबदला देण्याबाबत**

**(१३) १०६६७५ (०१-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम (ता.मालेगाव) जिल्हयातील हायड्रोकार्बनचा साठा असल्याची शक्यता तपासण्याची मोहिम तेल आणि नैसर्गिक वायु महामंडळामार्फत करण्यात येत असून या मोहिमेसाठी वापरण्यात येत असलेली वाहने आणि इतर साहित्यामुळे रब्बीच्या पिकांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसानीसाठी प्रशासनाकडून मोबदला दिला जात असला तरी तो अतिशय नगण्य असल्याने शेतक-यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उक्त मोहिमेमध्ये बाधीत होणा-या शेतक-यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) देशातील गाळयुक्त अज्ञात खोऱ्यामध्ये हायड्रोकार्बनचे साठे असल्याचे शक्यता तपासण्याची, सेसमीक डेटा संकलीत करण्याचे काम ओ.एन..जी.सी. कडे सुपूर्द करण्यात आले होते. सदर काम राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामवंत सर्विस प्रोव्हाईडर्सच्या माध्यमातून करुन घेण्याबाबत महसूल व वन विभागाकडून त्यांच्या दिनांक ३० जून,२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी,वाशिम यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने मालेगाव तालुक्यातील निश्चित केलेल्या ११ गावामध्ये सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या अल्फा जिओ (इंडिया) लि., हैद्राबाद या संस्थेस योग्य सहकार्य करण्यासाठी सूचना देण्यात आल्या होत्या. सर्वेक्षणाच्या कामाकरिता निश्चित केलेल्या ठिकाणच्या शेतकऱ्यांची परवानगी घेऊन तसेच कंपनीकडून वापरण्यात येत असलेले वाहने व इतर साहित्यामुळे त्यांच्या रब्बी पिकाच्या झालेल्या नुकसानीचा आर्थिक मोबदला नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देऊन सवेक्षणाचे काम करण्यात आले आहे. अधिक मोबदला मिळणे करिता कोणत्याही तक्रारी उक्त कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम, यांना प्राप्त झालेल्या नाहीत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मनमाड व चांदवड (जि.नाशिक) विभागातील शेतकऱ्यांनी कृषी पंपासाठी अनामत रक्कमा भरूनही त्यांना विद्युत जोडण्या देण्यात न आल्याबाबत**

**(१४) १०६७१९ (०४-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा)** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनमाड व चांदवड (जि.नाशिक) विभागातील सुमारे १७,००० शेतकऱ्यांनी कृषी पंपासाठी अनामत रक्कमा भरूनही त्यांना विद्युत जोडण्या देण्यात न आल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी मा.उर्जा मंत्री यांचेकडे लेखी तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनमाड व चांदवड विभागातील प्रलंबित कृषी पंपांना वीज जोडणी देण्याच्या कामाचा सन २०१५ मध्ये इन्फ्रा-२ या योजनेत समावेश केल्यामुळे ही प्रलंबित कामे सहा महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित असतांना दोन वर्षे होवूनही इन्फ्रा २ मधून शेतकऱ्यांना वीज जोडण्या देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शेतक-यांना तात्काळ जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

प्रलंबित कृषी पंपाची कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावेत यासाठी मनमाड व चांदवड विभागातील एकूण १६९० कृषीपंप जोडणीचे काम पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत कंत्राटदारास देण्यात आलेले होते. परंतु त्यांनी नेमून दिलेले काम अत्यंत धीम्या गतीने केल्यामुळे, सदर काम त्यांच्याकडून काढून घेण्यात आले. त्यानंतर सदर काम जलद गतीने व्हावे याकरिता समांतर निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. पायाभूत आराखडा-२ समांतर निविदांतर्गत चांदवड विभागाकरिता १००१ व मनमाड विभागाकरिता १२०५ असे एकूण २२०६ कृषीपंप ग्राहकांच्या जोडणीकरीताचे काम निर्धारित आहे. त्यापैकी चांदवड विभागात व मनमाड विभागात अनुक्रमे ५५३ व ५९८ (एकूण ११५१) कृषीपंप वीज जोडणीचे काम पूर्ण झाले आहे.

(३) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या २,२४,७८५ कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणाली (HVDS) द्वारे वीज जोडणी देण्यासाठी रु.५०४८.१३ कोटीच्या नवीन योजनेस मंजुरी देण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यातील १९६२८ कृषीपंप ग्राहकांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने सेवाकर वसुलीमध्ये गैरप्रकार केल्याबाबत

**(१५) १०६९४७ (२०-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने सेवाकर वसूलीमध्ये गैरप्रकार केल्याबाबत दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासनाच्या आदेशान्वये द्विसदस्यीय समिती नेमली असून या समितीने चौकशी अहवाल अद्याप शासनास सादर केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने चौकशी अहवाल अद्याप शासनास सादर न करण्याची व त्यास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत समितीने चौकशी अहवाल शासनास सादर केला असल्यास, त्याचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-१०-२०१८)** : (१) सेवाकर वसुलीमध्ये गैरप्रकार तसेच सेवाशुल्क आकारणी/वसूलीबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल देण्यासाठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने त्यांचे स्तरावर दिनांक २८.९.२०१७ चे कार्यालयीन आदेशाद्वारे द्विसदस्यीय समिती नियुक्त केलेली असून सदर समितीचा अहवाल अद्यापि त्यांना प्राप्त झालेला नाही.
शासनाने समितीची नियुक्ती केलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड शहरातील गंजलेले विदयुत खांब बदलण्याबाबत**

**(१६) १०७२२५ (०४-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड शहरातील (जि.कोल्हापूर) गंजलेले धोकादायक खांब बदलण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८)** : (१) हे खरे आहे.
(२) चंदगड शहरातील (जि.कोल्हापूर) गंजलेले/धोकादायक/मोडकळीस आलेले खांब सरळ करणे इत्यादी कामे सन २०१७-१८ मधील देखभाल व दुरुस्ती योजनेअंतर्गत करण्यात आलेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.
१) गंजलेले/धोकादायक/मोडकळीस आलेले खांब बदलणे -२४ नग
२) वाकलेले खांब सरळ करणे-०८ नग
३) लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या दुरुस्ती करणे-१३ इत्यादी कामे करण्यात आली आहेत.
सद्यपरिस्थितीत विद्युत वाहिन्या दुरुस्ती व देखभाल करण्याच्या कामांकरिता चंदगड तालुक्यासाठी दोन ठेकेदारांची नियुक्ती केली असून प्रत्येकी रक्कम रु. ७.५ लाखांच्या कामांचे आदेश निर्गमित केलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांनी शेतीपंपासाठी वीज जोडणी मिळण्याबाबत**

**(१७) १०७२२८ (०४-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांनी शेतीपंपासाठी वीज जोडणी मिळण्याबाबत गत सहा महिन्यांपूर्वी अनामत रक्कम भरुनही त्यांना अद्याप वीज जोडणी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना वीज कनेक्शन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या सुमारे २.२५ लाख कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणालीद्वारे (HVDS) वीज जोडणी देण्यासाठी नवीन योजना अंमलात आणण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील १०४०२ कृषीपंप ग्राहकांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे पिंपळघर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे राहत्या घरावरुन गेलेल्या २२ के.व्ही. (हायटेंशन) तारांचे स्थलांतरण करणेबाबत

**(१८) १०७६६७ (०४-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपळघर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे ग्रामस्थांच्या राहत्या घरावरुन गेलेल्या २२ के.व्ही. (हायटेंशन) तारांचे स्थलांतरण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, कल्याण यांच्याकडे दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनानुसार महावितरण कंपनीमार्फत स्थळ पाहणी करुन तांत्रिक अंदाजपत्रक

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत (डी.पी.डी.सी.) मंजूर होऊन कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले होते. परंतु सदर कामांचे दर परवडत नसल्यामुळे कार्यादेश रद्द करण्याबाबत कंत्राटदाराने कळविले. त्यामुळे दिनांक ०७.०४.२०१८ च्या पत्रान्वये सदर कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही सुरु असून सदरील निविदा प्रक्रिया रद्द करुन नवीन निविदा प्रक्रिया प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयात महावितरण कंपनीने कृषीपंपाच्या जोड भारमध्ये वाढ केल्याबाबत**

**(१९) १०७८३७ (०४-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात महावितरण कंपनीने पाच वर्षांपूर्वी मार्च, २०१२ मध्ये सेल वाढलेला दाखविण्यात येऊन राज्यातील कृषीपंपाच्या जोड भारमध्ये बेकायदेशीर कोटयावधी रुपयांची परस्पर वाढ करण्यात आल्याचे माहे जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणात दोषी आढळून येणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच कृषीपंपाच्या जोड भारमध्ये बेकायदेशीर करण्यात आलेली वाढ रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

लातूर मंडळांतर्गत मार्च, २०१२ मध्ये मार्च, २०११ च्या तुलनेत ९६११ ने कृषीपंपाच्या संख्येत वाढ झाली. तसेच सदर कालावधीत कृषी ग्राहकांच्या स्थळ तपासणीमध्ये वाढीव जोडभार आढळल्याने मार्च, २०१२ मध्ये कृषीग्राहकांचा वीजवापर वाढल्याचे आढळून आले आहे.

(३) कृषीपंप ग्राहकांना त्यांच्या वापरातील अश्वशक्तीप्रमाणे विद्युत देयके देण्यात येतात. महावितरण कंपनी अंतर्गत कृषी पंपधारक ग्राहकांचे सर्वेक्षण करण्यात येते. या सर्वेक्षणामध्ये ग्राहकांचा जोडलेला भार मंजूर भारापेक्षा जास्त असल्याचे काही ग्राहकांकडे आढळून आल्यास त्याअनुषंगाने वाढीव मंजूर भाराप्रमाणे त्यांना वीज बिले देण्यात येतात. चुकीच्या अश्वशक्तीचे विद्युत देयके दिल्याबाबतच्या तक्रारी क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाल्यास त्याची शहानिशा करुन वीज बिले स्थानिक क्षेत्रिय कार्यालयाकडून दुरुस्त करण्यात येतात. तसेच कृषीपंप ग्राहकांच्या वीज देयकाच्या दुरुस्तीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या दुरुस्तीसाठी

दि.०१.१२.२०१७ ते ३१.१२.२०१७ या कालावधीत फिडर निहाय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुख्यमंत्री कृषि संजीवनी योजनेला मुदतवाढ देऊनही प्रतिसाद मिळाला नसल्याबाबत**

**(२०) १०७९२१ (०४-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजनेला दि. ३० नोव्हेंबर पर्यत मुदतवाढ देऊनही प्रतिसाद मिळाला नसल्याने अहमदनगर जिल्हयातील कृषि पंप थकबाकी ग्राहकांचा वीज पुरवठा माहे डिसेंबर, २०१७ च्या सुमारास खंडीत करण्याची कारवाई महावितरण कंपनीने सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शेतक-यांच्या पिकाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, महावितरणाच्या चुकीच्या बिलांमुळे सदरील थकबाकी असून शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत अहमदनगर जिल्ह्यातील ५४,८८४ कृषीपंप थकबाकी ग्राहकांचा वीज पुरवठा मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजनेत सहभागी न झाल्यामुळे तात्पुरता खंडीत केलेला होता.
(२) व (३) कृषीपंप ग्राहकांना ज्या ठिकाणी वीजमीटर लावलेले आहे, तेथे मोबाईल ॲपद्वारे रिडींग घेऊन वीजबिले देण्यात येत आहेत. तसेच महावितरणच्या दिनांक २१.१२.२०१७ च्या परिपत्रान्वये आदेश काढून चुकीच्या बिलाच्या दुरुस्तीकरीत फिडरनिहाय शिबीर घेण्याचे निदेश दिले. त्यानुसार डिसेंबर, २०१७ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात एकूण ६४ शिबीरे घेऊन ९३५ वीज देयकांची दुरुस्ती सदर शिबीरात करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**सोनईच्या दत्तानगर (जि.अहमदनगर) येथील पाणी पुरवठा योजनेच्या वीज पंपाचा वीजपुरवठा महावितरण कंपनीने खंडीत केल्याबाबत**

**(२१) १०७९२४ (१८-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनईच्या-दत्तानगर (जि.अहमदनगर) येथील पाणी पुरवठा योजनेच्या वीज पंपाचा वीजपुरवठा महावितरण कंपनीने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास खंडीत केला

आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदरील वीज पुरवठा पूर्ववत सुरु न केल्यास वीज वितरण कार्यालय बंद करण्याचा इशारा ग्रामपंचायत सदस्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार वीज पुरवठा तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) सदरील योजनेचा वीज पुरवठा थकीत वीज देयकाचा भरणा न केल्यामुळे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये कायमस्वरुपी खंडीत करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महावितरणच्या घोडेगाव उपविभागाअंतर्गत असलेल्या पाणी पुरवठा योजना, सोनई, ता. नेवासा, जि.अहमदनगर यांचेकडील वीज देयक थकीत असल्याकारणाने महावितरणकडून दिनांक १३.०७.२०१७ व दिनांक १४.०९.२०१७ रोजी वीजपुरवठा तात्पुरता खंडीत करण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. परंतु सदर ग्राहकाकडून थकबाकीचा भरणा न झाल्यामुळे माहे सप्टेंबर, २०१७ अखेर ग्राहकाकडे रु.४.२३ लाख थकबाकी झाली होती. थकबाकी भरण्यास ग्राहकाकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सदर पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### विदर्भातील कृषी पंप वीज जोडणीचा अनुशेष दूर करण्याबाबत

**(२२) १०७९८३ (१८-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील कृषी पंप वीज जोडण्यांचा अनुशेष सन २०१४ अखेर सुमारे ६ लक्ष ९० हजार ५२१ इतका असून मार्च, २०१४ पर्यंत विदर्भातील एकूण ६५,६४८ प्रलंबित अर्जापैकी ५५,४४३ अर्जदारांनी आवश्यक शुल्क सुद्धा भरले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रलंबित अर्जदारांपैकी सन २०१३ - २०१४ या वर्षात फक्त २५,८५९ कृषी पंपांना वीज जोडणी देण्यात आली आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास. उक्त प्रकरणी कृषी पंपांचा अनुशेष दूर करुन वीज जोडणी तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-११-२०१८) :** (१) राज्यात सन २०१३-१४ मध्ये २०२३५२ व सन २०१४-१५ मध्ये १७३८५२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित असून त्यापैकी विदर्भामध्ये सन २०१३-१४

मध्ये ५८०७९ व सन २०१४-१५ मध्ये ६५७७२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते.
(२) हे खरे आहे. राज्यात सन २०१३-१४ मध्ये २०२३५२ अर्जदार पैसे भरुन प्रलंबित असून विविध योजनांतर्गत १२४७६९ कृषी पंपाना वीजजोडणी देण्यात आली आहे. त्यापैकी विदर्भात सन २०१३-१४ मध्ये विविध योजनांतर्गत २५८५९ कृषी पंपांना वीज जोडणी देण्यात आली आहे.
(३) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या सुमारे २.२५ लाख कृषिपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणालीद्वारे (HVDS) वीजजोडणी देण्यासाठी नवीन योजना अंमलात आणण्यात आली असून सदर योजनेतंर्गत विदर्भातील सदर कृषिग्राहकांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कार्यालयातील कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२३) १०८५३७ (०४-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली)** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कार्यालयातील कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणी करण्यात आली असून वर्ग ३ व ४ ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व कधीपर्यंत सदर प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०२-११-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) होय. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उपलब्ध करून देण्यात आलेले वर्ग -२ संवर्गातील ७ उमेदवारांना तसेच पदोन्नतीने वर्ग-२ च्या १० उमेदवारांना अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयात नियुक्ती देण्यात आलेली आहे. या शिवाय वर्ग -१ ची उपसंचालक संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे तसेच वर्ग-३ च्या एकूण १६६ पदांपैकी १४३ पदे भरण्यात आलेली आहेत. सद्यास्थितीत एकूण २९७ मंजूर पदांपैकी २३१ पदे भरण्यात आली आहे.

---

**पुणे येथील स्मार्ट ग्रीड प्रकल्पाबाबत**

**(२४) १०८८९९ (०४-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील औंध,बालेवाडी,बाणेर येथे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांसाठी तसेच नागरिकांना मुंबईच्या धर्तीवर चोवीस तास अखंडित आणि योग्य दाबाने वीजपुरवठा करण्यासाठी स्मार्ट ग्रीड प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मार्ट ग्रीड प्रकल्पांतर्गत सोलर पॅनेलचा वापर करून निर्माण होणारी वीज स्मार्ट मीटरद्वारे महावितरणाच्या ग्रीडला जोडण्यात येणार असून या ग्रीड प्रकल्पास केंद्र शासन व राज्य शासनाकडून आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तथापि सदर प्रकल्पाला बँक हमी नसल्यामुळे स्मार्ट ग्रीड प्रकल्प कार्यान्वित होण्यास विलंब लागत असून हमी देण्याबाबत व शासनाकडून योग्य ती आर्थिक तरतूद उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) महावितरणने स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत पुणे शहरामध्ये विद्युत पुरवठा अखंडीत व योग्य दाबाने करण्यासाठी व पायाभूत सुविधा सुधार करण्यासाठी रु. २०४.१७ कोटीचा प्रकल्प अहवाल दिनांक २६.१२.२०१६ रोजी केंद्र शासनास सादर केला. परंतु त्यास अद्याप मंजूरी/निधी प्राप्त झालेला नाही. पुणे शहराकरिता स्मार्ट ग्रीड प्रकल्प प्रस्तावित करण्यात आलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.बीड) तालुक्यातील १४ गावे कृषि उत्पन्न बाजार समिती,**
**शिरूर यांच्याशी संलग्न करण्याबाबत**

**(२५) १०९०४४ (२०-०४-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.बीड) तालुक्याच्या निर्मितीनंतर येवला तालुक्यातील १४ गावे शिरूर तालुक्यात समाविष्ट करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू १४ गावे सद्य:स्थितीत कृषि उत्पन्न बाजार समिती, येवला यांच्याशी संलग्न असल्याने सदरहू १४ गावे कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरूर यांच्याशी संलग्न करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने येवला तालुक्यातील १४ गावे कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरूर यांच्याशी संलग्न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-१०-२०१८) :** (१) नाही.

शिरूर (जि.बीड) तालूक्याच्या नवनिर्मितीनंतर येवला तालुक्यातील १४ गावे शिरूर तालूक्यात समाविष्ट करण्यात आलेली नसून गेवराई तालूक्यातील १४ गावे शिरूर (कासार) तालुक्यात समाविष्ट करण्यात आली आहेत.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील शेतक-यांना अदयाप वीजजोडणी देण्यात आली नसल्याबाबत**

**(२६) १०९४१४ (०४-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील करमोडी येथील ३, चिंचगव्हाण येथील २ व शिवदरा येथील १ या शेतक-यांनी महावितरण कंपनीकडे दिनांक ११ जुलै, २०१४ व दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी कृषीपंपाची वीज जोडणी घेण्यासाठी ५ हजार २०० रुपये भरुनही त्यांना अदयाप वीज जोडणी देण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही या कृषीपंपाच्या वीज जोडण्या दिल्या नसून शेतक-यांना महावितरणने मात्र १० ते ५० हजारांची वीजबीले दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार येथील शेतक-यांना तातडीने कृषीपपांना विदयुत जोडण्या देण्याबाबत व बेकायदेशीरपणे वीजबीले देणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर ग्राहकांना “महावितरण आपल्या दारी” या योजनेअंतर्गत केबलद्वारे वीज जोडणी देण्यात आल्यामुळे बिले देण्यात आलेली आहेत.

(३) राज्यात “महावितरण आपल्या दारी” या योजनेअंतर्गत केबलद्वारे विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या एकूण १२९६५४ कृषीपंपांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक असून त्यासाठी एकूण रु.१२५८.६७ कोटींची योजना महावितरण कंपनीमार्फत तयार करण्यात आली असून त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील १०३८१ कृषीपंप ऊर्जीकरणाकरिता रु.१००.७८ कोटी इतका

निधीचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुधागड तालुक्यात (जि.रायगड) महावितरणकडून ग्राहकांना वाढीव विज बिल देण्यात येत असल्याबाबत

**(२७) १०९९३५ (०४-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड तालुक्यात (जि. रायगड) दर महिन्याला महावितरणकडून ग्राहकांना वाढीव विज बिल देण्यात येत असल्याबाबतच्या अनेक तक्रारी माहे डिसेंबर,२०१७ मध्ये वा त्या सुमारास करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच मिटर रिडिंंग करणा-या एजन्सीकडून योग्य प्रकारे रिडिंग घेत नसल्याच्याही तक्रारी असून सदर एजन्सी बदलण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) कल्याण परिमंडळ अंतर्गत पेण मंडळातील रोहा विभागातील सुधागड तालुक्यात डिसेंबर, २०१७ मध्ये घरगुती, वाणिज्य, औद्योगिक व इतर वर्गवारीच्या वीज ग्राहकांची एकूण २६७४९ संख्या आहे. त्यापैकी ८८० ग्राहकांच्या चुकीचे वीज देयकाच्या तक्रारीचे निवारण करुन सदर देयके दुरुस्त करुन देण्यात आली आहेत. मीटर वाचन (रिडिंग) घेणाऱ्या तीन एजन्सीकडून, सदोष मीटर वाचनामुळे, एकूण रु.१८,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला शहरातील इंधन समायोजन आकार या नावाखाली नागरिकांकडून करण्यात येत असलेली वसुली बंद करण्याबाबत

**(२८) १०९९६३ (०४-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील कंझ्युमर फेजवर लावलेल्या पथदिव्यांची चोरी अथवा गळती झाल्यास त्याचा मोबदला इंधन समायोजन आकार या नावाखाली प्रत्येक ग्राहकाकडून वसूल केला जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्राहकांकडून इंधन समायोजन आकार या नावाखाली करण्यात येणारी वसुली ही

महापालिका व वितरण कंपनीमध्ये समन्वय नसल्याने करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इंधन समायोजन आकार या नावाखाली नागरिकांकडून करण्यात येत असलेली वसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोईसर (जि.पालघर) येथील सी.बी.संखे शाळेच्यालगत व विजयनगर या नागरी वसाहतीमध्ये रोहित्राच्या खांबाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२९) १०९९६५ (०४-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर (जि.पालघर) येथील सी.बी.संखे शाळेलगत व विजयनगर या नागरी वसाहतीमध्ये रोहित्राच्या खांबांची दुरवस्था होऊन कोसळण्याच्या स्थितीत असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार दुरवस्थेस कारणीभूत असणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच रोहित्राच्या खांबाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांमार्फत सी.बी.संखे शाळेलगत व विजयनगर या नागरी वसाहतीची पाहणी करण्यात आली.
(३) सदर ठिकाणी पाहणी केल्यानंतर खांबाची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आढळून आली. त्यानुसार दि. ११ जानेवारी, २०१८ रोजी सदर ठिकाणचे रोहित्राचे खांब बदलण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरगा व लोहारा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) विज देयके दुरूस्त करण्याबाबत.**

**(३०) ११०८२५ (०४-०४-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरणच्या नव्याने निघालेल्या कृषी संजीवनी योजनेत उमरगा व लोहारा तालुक्यातील

(जि.उस्मानाबाद) अनेक ग्राहकांनी या योजनेतंर्गत विजबील भरूनही त्यांना अजुनही जुन्याच देयकाप्रमाणे विजबीले येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बीले दुरूस्ती करून शेतकऱ्यांना होणारी गैरसोय दूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. तुळजापूर यांना लेखी निवेदनादवारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असुनही ग्राहकांना चुकीचे विजबीले दुरूस्त करणेबाबत अदयापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
व्याज व दंड व्यतिरिक्त मूळ मुद्दलाच्या थकबाकीची दहा/पाच समान हप्त्यांमध्ये विभागणी करुन स्वतंत्र वीज देयकाबाबत माहिती कृषी ग्राहकांना देण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
परंतु वाणिज्य परित्रक दिनांक २८.१२.२०१७ प्रमाणे कृषीपंप वीज बिल दुरुस्तीसाठी फिडर निहाय शिबीरांचे आयोजन करण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.
उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये कृषी ग्राहकांच्या वीज बिल दुरुस्तीसाठी फिडर निहाय १९ शिबीरे घेण्यात आलेली आहेत. त्यापैकी उमरगा उपविभागामध्ये ०२ व लोहारा मध्ये उपविभागामध्ये ०२ शिबीरे घेण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना कृषीपंपांना वीजजोडणी मिळण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(३१) १११४६१ (०४-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात इन्फ्रा- २ नंतर कोणतीही योजना महावितरणने पश्चिम महाराष्ट्रासाठी सुरु केलेली नसल्यामुळे पुणे जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना कृषीपंपांना वीजजोडणी देण्यास विलंब होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत उक्त योजनेला पर्यायी योजना सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधीनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास केली असून याबाबत उक्त योजना १५ दिवसाचे आत सुरु करण्याचे निर्देश मा. उर्जामंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजना सुरु करणेबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-११-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या सुमारे २.२५ लाख कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणालीद्वारे (HVDS) वीज जोडणी देण्यासाठी नवीन योजना जाहीर करण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत वीज जोडणीचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली जिल्हयातील शिराळा उपविभागामध्ये चरण, मनधूर व टाकवे हे तीन गावठाण फिडर विभक्त करुन शेतीपंपासाठी स्वतंत्र फिडर निर्माण करण्याबाबत

**(३२) १११६४० (०४-०४-२०१८). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील शिराळा उपविभागामध्ये चरण, मनधूर व टाकवे हे तीन गावठाण फिडर विभक्त करुन शेतीपंपासाठी स्वतंत्र फिडर निर्माण करण्याचे काम मागील २ वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित शेतक-यांनी शिराळा उपविभागाकडे विद्युत कनेक्शन मिळावे म्हणून अर्ज केले असून त्यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही न झाल्याने तेथील शेतक-यांना पिंकांना पाणी देता न आल्याने नुकसान झाले असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जा मंत्री यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, यानुसार शासनाने शेतीपंपासाठी स्वतंत्र फिडर निर्माण करण्याचे काम पूर्ण करण्याबाबत तसेच शिराळा उपविभागाकडे विद्युत कनेक्शन मिळावे म्हणून अर्ज केलेल्या शेतक-यांना कनेक्शन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या सुमारे २.२५ लाख कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणालीद्वारे (HVDS) वीज जोडणी देण्यासाठी नवीन योजना अंमलात आणण्यात आली असून असून सदर योजनेंतर्गत सांगली जिल्हयातील १८५९४ कृषीपंप ग्राहकांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भेंडवडे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील श्री महावीर विविध कार्यकारी सहकारी संस्थेतील गैरव्यवहाराबाबत**

**(३३) १११७२५ (२१-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)भेंडवडे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील श्री महावीर विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या गैरव्यवहारात वारणा संस्थेचे संचालक, वारणा सहकारी साखर कारखान्यांचे संचालक, व भेंडवडे गावचे सरपंच, वारणा सहाकरी दूध संघाचे माजी संचालक यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक अशा ६ जणांना सहकारी संस्था निबंधक यांनी ५ वर्षासाठी माहे डिसेंबर, २०१७ वा त्यादरम्यान अपात्र ठरविले आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने अधिकची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितावर अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१८) :**

(१) व (२) दि.२८.११.२०१७ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले यांनी श्री.अण्णासाहेब बा. देसाई व इतर ५ सदस्यांना श्री महावीर विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्या. भेंडवडे या संस्थेचे संचालक म्हणून अपात्र ठरविण्याचे आदेश पारित केले. सदर आदेशांविरुद्ध संबंधितांनी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांचेकडे अपील दाखल केले असून उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले यांच्या आदेशांना दिनांक १३/१२/२०१७ रोजी तात्पुरती स्थगिती देण्यात आली असून सदर प्रकरणी सुनावणी अद्याप सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब (जि. यवतमाळ) शिवारातील शेतक-यांना महावितरणने विद्युत मीटर तसेच विद्युत जोडणी न देता गैरकारभार केल्याबाबत**

**(३४) ११२६३० (१८-०४-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि. यवतमाळ) शिवारातील काही शेतक-यांना महावितरणने विद्युत मीटर तसेच विद्युत जोडणी न देता माहे नोव्हेंबर, २०१७ चे रू. ४९७० रूपयांचे बिल पाठवुन विज कंपनीने गैरकारभार केल्याचे माहे डिसेंबर,२०१७ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने विज वितरण कंपनीच्या या गैरकारभाराची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबधित शेतक-यास भरपाई देण्याबाबत व अवास्तव बिल देणा-यांवर

कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) होय. महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली.
(३) कार्यकारी अभियंता, यवतमाळ विभाग यांनी संबंधित सहाय्यक अभियंता, कळंब शहर यांना दिनांक १७.०२.२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली होती व त्यानुसार संबंधित अभियंत्याने खुलासा सादर केला होता. सदर खुलासा समाधानकारक नसल्यामुळे सक्षम अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, यवतमाळ विभाग यांनी संबंधित अभियंत्यास रु.५,०००/- रकमेचा दंड ठोठावला आहे. महावितरण कंपनीस खोटी माहिती पुरवून दिशाभूल करणारी एजन्सी मे. अतुल इलेक्ट्रीकल्स व इंजीनियर्स, यवतमाळ यांचेकडून खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे एकतर्फी कारवाई करुन एजन्सीकडून रु.१०,०००/- दंड अनामत रकमेतून वसूल करण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारामती (जि.पुणे) तालुक्यातील १७ पाणीपुरवठा योजनांचा व न्हावरे (ता.शिरुर, जि.पुणे) येथील पाणीपुरवठा योजनांचा वीज पुरवठा वीज देयक न भरल्यामुळे खंडित केल्याबाबत**

**(३५) ११३१९९ (०४-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बारामती (जि.पुणे) तालुक्यातील १७ पाणीपुरवठा योजनांचा व न्हावरे (ता.शिरुर, जि.पुणे) येथील पाणीपुरवठा योजनेचा वीज पुरवठा वीज देयक न भरल्यामुळे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात खंडीत करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पाणीपुरवठा योजनांची कोट्यावधी रुपयांची वीज देयक थकलेली असल्याने ती ग्रामपंचायतींना भरणे अशक्य झाले असल्याने महावितरणने या थकित देयकांचा भरणा करण्यासाठी हप्ते पाडून दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार पाणी पुरवठा योजनांची विज देयके पूर्ण माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक १६.०५.२०१८ च्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेच्या दिनांक ३१.०३.२०१८ अखेरच्या वीज बिलाच्या मूळ थकबाकी रक्कमेपैकी ५०% रक्कम ग्राम विकास विभागाने महावितरण कंपनीस वित्त आयोगाच्य निधीमधून थेट अदा करावयाचे आहे व उर्वरित ५०% रक्कम संबंधित ग्रामपंचायतीने महावितरण कंपनीकडे सुलभ हप्त्यांमध्ये भरावयाची आहे.

(३) ग्रामपंचायत, न्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे यांनी न्हावरा येथील पाणीपुरवठा योजनेच्या वीज पुरवठ्याची थकबाकी हप्त्याने भरणेसाठी महावितरणच्या सांघिक कार्यालयाने मंजुरी दिली असून सदर ग्रामपंचायतीने दिनांक १८.०१.२०१८ रोजी रु. २.०९ लाख रक्कम भरणा केल्यानंतर सदर पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा पूर्ववत जोडून देण्यात आलेला आहे. तसेच बारामती तालुक्यातील खंडीत केलेल्या ६६ पाणी पुरवठा योजनांची एकूण रु.२७.२२ लाख देयकाची रक्कम भरल्यानंतर वीज पुरवठा पूर्ववत जोडून देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील शेतक-यांना वीज कनेक्शन देणे व रोहित्र बसविणेची कामे अपूर्ण स्थितीत असल्याबाबत**

**(३६) ११३७९४ (०४-०४-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माढा, पंढरपूर, माळशिरस (जि. सोलापूर) यासह अनेक तालुक्यातील शेतक-यांना वीज कनेक्शन देणेची तसेच नवीन रोहित्र बसविणेची कामे इन्फ्रा २ अंतर्गत अपूर्ण स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बार्शी विभागातील माढा तालुक्यामध्ये सुमारे २४०० शेतक-यांची वीज कनेक्शनची कोटेशन भरलेले असून १७० रोहित्र मंजूर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील शेतक-यांनी नव्याने कोटेशन मागणी केली असता वीज कोटेशन क्षेत्रीय अधिका-यांकडून दिले जात नसल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, नव्याने मागणी केलेल्या शेतक-यांना कोटेशन देणेसंदर्भात तसेच कोटेशन भरलेल्या शेतक-यांना कनेक्शन देणे व नवीन रोहित्र बसविणेसाठी निधी उपलब्ध करून देणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
पायाभूत सुविधा आराखडा-२ अंतर्गत सोलापूर जिल्हयातील माढा, माळशिरस, करमाळा, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट व मोहोळ या तालुक्यातील एकूण २२७० नवीन वितरण रोहित्रे उभारणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच पंढरपूर, मंगळवेढा व सांगोला तालुक्यामध्ये पायाभूत सुविधा आराखडा-२ अंतर्गत अनुक्रमे ४४९, २०२ व २९९ नवीन वितरण रोहित्र प्रस्तावित आहेत, त्यापैकी अनुक्रमे ४१४, १७२ व २६१ नवीन वितरण रोहित्रांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
(२) मार्च, २०१८ अखेर माढा तालुक्यात कृषीपंप वीज जोडणीसाठी २४७६ ग्राहक पैसे भरुन प्रतिक्षा यादीत प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित कृषीपंप ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी २१०४ वितरण रोहित्रांना HVDS योजनेअंतर्गत मंजुरी देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी वीज जोडणीसाठी अर्ज केला असता त्यांना रितसर मंजुरी देऊन कोटेशन देण्यात येत आहे.

(४) राज्यात मार्च, २०१८ अखेर पैसे भरुन असणाऱ्या सुमारे २.२५ लाख कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणाली (HVDS) द्वारे वीज जोडणी देण्यासाठी नवीन योजना अंमलात आणण्यात आली असून सदर योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील १४७१६ कृषीपंप ग्राहकांचा समावेश आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेची नोकरभरती रद्द करण्याबाबत

**(३७) ११६४७० (२३-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा निर्मिती नंतर अद्यापि पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ७ जानेवारी, २०१८ च्या बँकेच्या नोकरभरतीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्यामुळे बँकेचे विभाजन अद्यापपर्यंत प्रलंबित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, टीडीसीसी च्या नोकरभरतीवर तातडीने स्थगिती आणून पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-११-२०१८) :** (१) होय.

(२) नाही

(३) ठाणे जि.म.स. बँकेच्या नोकर भरतीबाबत मा. उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र. PIL/३/२०१८ व रिट याचिका क्र.३९६३/२०१८ दाखल असून सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

सहकार आयुक्तांनी दिनांक ०९/०५/२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे यांना बँकेची दिनांक ३१/०३/२०१८ अखेरची आर्थिक पत्रके तयार करून तसेच ती बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकाकडून तपासून घेऊन बँकेच्या संचालक मंडळाच्या ठरावासह बँक विभाजनाचा प्रस्ताव विनाविलंब सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) येथील सुमारे १२५ जिल्हा परिषद शाळांची वीज जोडणी तोडण्यात आल्याबाबत

**(३८) ११७११० (२८-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील सुमारे १२५ जिल्हा परिषद शाळांची ऐन उन्हाळयात व

परिक्षांच्या कालावधीमध्ये वीज जोडणी तोडण्यात आल्याचे माहे मार्च, २०१८ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, ऐन उन्हाळयात वीज तोडण्याची कारणे काय आहेत,

(३)असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-११-२०१८) :** (१) पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात एकूण ६८ जिल्हा परिषद शाळांना वीज जोडण्या दिलेल्या आहेत. त्यापैकी ५९ शाळांनी माहे फेब्रुवारी, २०१८ अखेरचे वीज देयके भरलेली आहेत व उर्वरित ९ जिल्हा परिषद शाळांची वीज जोडणी, वीज बिल थकबाकी नोटीस देऊनही भरणा न केल्यामुळे, माहे मार्च, २०१८ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात खंडित करण्यात आल्या आहेत.

(२) माहे मार्च, २०१८ अखेर ०९ जिल्हा परिषद शाळांची वीज देयक थकबाकी रु. ३५,१८०/- एवढी असल्यामुळे सदर ०९ शाळांचा वीज पुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आलेला आहे.

(३) वीज पुरवठा खंडित ०९ जिल्हा परिषद शाळांपैकी ०२ शाळांनी थकबाकीचा भरणा केल्यामुळे वीज पुरवठा जोडून देण्यात आलेला आहे.

(४) सद्य:स्थितीत ०७ जिल्हा परिषद शाळांनी थकबाकीचा भरणा न केल्यामुळे त्याचा वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आलेला नाही.

---

## अंजनवेल (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील गॅस आणि वीज कंपनीला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनच्या दुरुस्तीबाबत

**(३९) ११७४४९ (२३-०७-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनवेल (ता. गुहागर जि.रत्नागिरी) येथील रत्नागिरी गॅस आणि वीज कंपनीला शिरळ (ता.चिपळूण) येथून पाईपलाईनने पाणीपुरवठा केला जात असून सदर पाईपलाईन सुमारे २० वर्षापूर्वीची असून सदय:स्थितीत जीर्ण झाल्याने पाण्याची गळती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईपलाईनमधून पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने रत्नागिरी गॅस व वीज कंपनीला अनेकदा टँकरने पाणी विकत घ्यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपन्यांची गैरसोय दूर करण्याच्यादृष्टीने सदर पाईपलाईन बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-१०-२०१८) :**

(१) हे खरे आहे. तथापि सदर पाईपलाईनची दुरुस्ती करुन पाणी पुरवठा पूर्ववत करण्यात

येतो.

(२) माहे मे, २०१८ मध्ये ६० मी. पाईपलाईन बदलण्याचे काम सुरु होते. या कालावधीत रत्नागिरी गॅस व रत्नागिरी गॅस अ‍ॅण्ड पॉवर प्रा. लि. (RGPPL) यांना टँकरने पाणी घ्यावे लागले होते.

(३) रत्नागिरी गॅस अ‍ॅण्ड पॉवर प्रा. लि. (RGPPL) च्या प्रकल्पास पाणी पुरवठा करण्यासाठी शिरळ पंप हाऊस व पाईपलाईन्सचे बांधकाम, उभारणी व कमिशनिंगचे कार्य एम.आय.डी.सी. चिपळूण विभागाने केलेले होते. तत्कालीन डीपीसी/एमआयडीसीकडून महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे शिरळ पंप हाऊस संचालनासाठी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) कडे दि. ०१.०७.१९९९ रोजी हस्तांतरित करण्यात आले.

सदर योजनेचे आयुष्य जवळपास संपुष्टात आलेले असल्यामुळे शिरळ पंप हाऊसची कामगिरी व क्षमता कमी झालेली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा यंत्रणा पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी बरीच दुरुस्ती व नूतनीकरण करणे गरजेचे आहे. त्याकरिता शिरळ पंप हाऊस व पाईपलाईनचे संचलन व सुव्यवस्था अनुभवी शासकीय संस्थेकडे अथवा रत्नागिरी गॅस अ‍ॅण्ड पॉवर प्रा. लि. कंपनीकडे देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कापडणे व नेर (ता.धुळे) या गावात आदिवासी भवन बांधण्याची होत असलेली मागणी**

**(४०) ११७९६३ (२६-०७-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कापडणे व नेर (ता.जि. धुळे) या गावात आदिवासी समाजाची लोकसंख्या मोठया प्रमाणात असून या दोन्ही गावांमध्ये आदिवासी भवनाचे बांधकाम करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-१०-२०१८) :** (१) होय.

(२) लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने मौजे कापडणे व नेर ता.जि. धुळे या ठिकाणी सांस्कृतिक भवन निर्माण करण्याचा प्रस्ताव शिफारशीसह सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना विभागाच्या दिनांक १ जुलै,२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. मौजे कापडणे व नेर, ता.जि. धुळे ही गांवे आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील गांवे असल्याने आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १६.३.२०१६ मधील तरतुदीनुसार त्याठिकाणी या योजनेचा लाभ देता येणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पाच औद्योगिक वसाहतीतील ६६ भूखंड रिक्त असल्याबाबत**

**(४१) ११८२६५ (२३-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पाच औद्योगिक वसाहतीतील ६६ भूखंड रिक्त असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील भूखंड रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या रिक्त भूखंडाचे वाटप उद्योजकांना करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२९-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) म.औ.वि. महामंडळाच्या सुधारित धोरणानुसार ऑनलाईन ई-निविदा पध्दतीने भूखंड वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करण्याबाबत.**

**(४२) ११८३१९ (२६-०७-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण)** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करण्यात यावे यासह विविध मागण्यांसाठी एका संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे प्रशासनाला निवेदन दिले असल्याचे दि.२७.४.२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या मागणीबाबत यशवंत क्रांती सेनेने माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवडयात दिनांक ३० मे, २०१८ पर्यंत धनगर समाजाला आरक्षण द्यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाची दखल घेऊन शासनाने निर्णय घेऊन राज्यातील धनगर

समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करण्यासह त्यांच्या इतर मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३१-१०-२०१८) :** (१) व (२) धनगर समाज युवा मल्हार सेना महाराष्ट्र राज्य, धुळे यांच्यावतीने दिनांक २६.०४.२०१८ रोजी जिल्हाधिकारी, धुळे यांना महाराष्ट्रातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करणे व इतर मागण्यांबाबत निवेदन देण्यात आले होते. सदर निवेदनात त्यांनी मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास दि. ३१ मे, २०१८ नंतर तिव्र आंदोलन करणार असल्याचे नमूद केले होते.
(३) धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याच्यादृष्टीने धनगर व धनगड हे एकच आहेत किंवा कसे याचा अभ्यास करण्यासाठी टाटा समाज विज्ञान संस्थेस सुचित करण्यात आले होते. सदर संस्थेने त्यांचा अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालाची शासनस्तरावर छाननी करण्यात येत आहे. तसेच धनगर समाज युवा मल्हार सेनेच्या दि. २६.०४.२०१८ निवेदनातील इतर मागण्यांबाबत कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांना सूचीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वागळे इस्टेट येथील लोकमान्य नगरमध्ये (जि.ठाणे) महावितरणच्या उघड्या विद्युत वाहिनीचा धक्का लागून एका मुलीचा झालेला मृत्यु**

**(४३) ११९४२९ (२८-०७-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वागळे इस्टेट येथील लोकमान्य नगरमध्ये (जि.ठाणे) महावितरणच्या उघड्या विद्युत वाहिनीचा धक्का लागून एका मुलीचा मृत्यू झाल्याने नागरिकांनी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित जबाबदार असणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच भविष्यात अशी दुर्घटना पुन्हा घडू नये यासाठी महावितरणने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) विद्युत निरीक्षक, ठाणे यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली असून सदर अपघातास प्रथमदर्शनी निदर्शनास आलेल्या दोषी कर्मचाऱ्यास महावितरण कंपनीकडून निलंबित करण्यात येऊन विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच अपघातग्रस्त कु. सिध्दी रामचंद्र गुप्ता हिच्या कुटुंबियास तातडीची मदत म्हणून रक्कम रु. ४,००,०००/- (चार लाख रुपये) संबंधित वारसदार यांना अदा करण्यात आले आहेत.
(३) भविष्यात अशा दुर्घटना घडू नये म्हणून सदर भागातील वीज कनेक्शच्या खराब सर्व्हिस

वायर बदलण्याचे काम सुरु करण्यात आले. तसेच सर्व्हिस वायरचा संपर्क लोखंडी भागाशी होऊ नये यासाठी पी.व्ही.सी. पाईपमधून सर्व्हिस वायर टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कृषिपंप ग्राहकांकडे १३ हजार १७८ कोटी रुपयांची थकबाकी असल्याबाबत**

**(४४) ११९७९० (२८-०७-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषिपंप ग्राहकांकडे १३ हजार १७८ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रकमेच्या व्याजाची रक्कम मिळून महावितरणचे एकूण २२ हजार ८९१ कोटी रुपये येणे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास कृषी पंपावरील महावितरणची थकबाकी व व्याजाची रक्कम वसूल करण्यासंदर्भात महावितरणने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
राज्यातील कृषीग्राहकांकडील माहे मार्च, २०१८ अखेरची मूळ थकबाकी १४ हजार ३७० कोटी रुपये इतकी आहे.
(२) हे खरे आहे.
राज्यातील कृषीग्राहकांकडील माहे मार्च, २०१८ अखेरची व्याजाची रक्कम मिळून एकूण थकबाकी २४ हजार ६५१ कोटी रुपये इतकी आहे.
(३) कृषि पंपावरील महावितरणची थकबाकी व व्याजाची रक्कम वसूल करण्यासाठी महावितरणतर्फे सातत्याने प्रयत्न करण्यात येतो. तसेच कृषीग्राहकांना मूळ देयकाच्या थकबाकीची रक्कम हप्त्याने करण्याच्या सोयीसाठी शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०१७ अनुसार "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७" माहे नोव्हेंबर, २०१७ पासून राबविण्यात आली. यामध्ये रु.१९१.२७ कोटी चालू बिलापोटी जमा झालेले असून थकबाकीमधून ३३१.९५ कोटी रुपये रक्कम वसूल झालेले आहेत. तसेच महावितरण कंपनीच्या दिनांक २८.१२.२०१७ च्या परिपत्रकानुसार कृषीपंपाची वीज देयके दुरुस्त करण्यासाठी उपविभागीय स्तरावर वाहिनीनिहाय शिबीरे आयोजित करण्यात आली असून त्यामध्ये कृषीपंप ग्राहकांच्या वीज बिलाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कागल (जि.कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील विद्युत खांब दुरुस्त करण्याबाबत**

**(४५) १२१२१३ (२३-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल (जि.कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या हमरस्त्यावरील विद्युत खांब नादुरुस्त असल्याने प्रकाशा अभावी चोरीचे व अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औद्योगिक वसाहतीमधील विद्युत खांबाची दुरुस्ती करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२९-१०-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या हमरस्त्यावरील पथदिव्यांपैकी काही पथदिवे, होणाऱ्या अपरिहार्य तांत्रिक बिघाडांमुळे अल्पकाळ बंद होतात. हे बंद पडलेले पथदिवे, पथदिव्यांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीबाबत कंत्राटदाराशी करण्यात आलेल्या प्रचलित करारनाम्यानुसार दुरुस्त करुन कार्यान्वित केलेली आहे. तथापि, यामुळे मार्च २०१८ दरम्यान चोरीचे व अपघाताचे प्रमाण वाढले असल्याची तक्रार वा माहिती महामंडळास प्राप्त झालेली नाही.

(२)कागल- हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती कंत्राटदाराशी करण्यात आलेल्या प्रचलित करारनाम्यातून, अल्पकाळ बंद पडलेले पथदिवे दुरुस्त करुन, कार्यान्वित केलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळातील विपणन निरीक्षक या पदास नियुक्ती आदेश देणेबाबत

**(४६) १२१३१२ (२७-०७-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी महामंडळाने विपणन निरीक्षक या पदासाठी परिक्षा घेऊन अंतिम निकाल जाहीर करुन पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करुन दोन वर्ष होवूनही आजतागायत पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नियुक्ती आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आदिवासी विकास महामंडळातर्फे करण्यात आलेल्या पदभरती प्रक्रिये संदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सदर भरती प्रक्रीयेला शासनाने स्थगिती दिली आहे. या तक्रारींच्या

अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त यांनी चौकशीचा अहवाल शासनास सादर केला असून याबाबत पुढील कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महावितरणच्या विदर्भातील पाच प्रादेशिक कार्यालयात मुख्य अभियंत्याची पदे रिक्त असल्याबाबत

**(४७) १२२०५२ (२८-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात महावितरणची नागपूर , चंद्रपूर , अकोला , अमरावती , गोंदिया ही पाच प्रादेशिक कार्यालये असून सोबत गुणवत्ता नियंत्रण विभागही कार्यरत आहे मात्र सर्व कामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विदर्भात सहा मुख्य अभियंत्याची पदे रिक्त असून अमरावतीचे पद गेल्या सहा महिन्यापासून, गोंदियाचे पद गेल्या पाच महिन्यापासून आणि अकोला येथील पद गेल्या महिनाभरापासून रिक्त असल्याने या पदांचा कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आल्याने कामांवर परिणाम होत असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वादळी पाऊस पडल्यामुळे अनेक भागात मोठ्या प्रमाणात नुकसान होवून यंत्रणेत तांत्रिक बिघाड निर्माण झाला मात्र मुख्य अभियंत्याची पदे रिक्त असल्याने या कामावरही परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

अ) अमरावती परिमंडळाच्या मुख्य अभियंत्याची बदली झाल्यामुळे दि. ३०.१२.२०१७ ते दि. २४.०६.२०१८ या कालावधीत मुख्य अभियंत्याचे पद रिक्त होते व सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अधीक्षक अभियंता, अमरावती मंडल यांचेकडे सोपविण्यात आला होता. अमरावती परिमंडळासाठी नियमित मुख्य अभियंता दि. २५.०६.२०१८ रोजी नियुक्त करण्यात आले आहेत.

ब) अकोला परिमंडळातील मुख्य अभियंता यांची बदली झाल्याने दि. १९.०५.२०१८ ते दि. ०२.०७.२०१८ पर्यंत मुख्य अभियंत्याचे पद रिक्त होते व या कालावधीत अधीक्षक अभियंता, बुलढाणा यांचेकडे सदर पदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता. अकोला परिमंडळासाठी नियमित मुख्य अभियंता दि. ०३.०७.२०१८ रोजी नियुक्त करण्यात आले आहेत.

क) गोंदिया परिमंडळातील मुख्य अभियंता यांच्या सेवानिवृत्तीमुळे दि. ३१.१२.२०१७ ते दि. ०१.०७.२०१८ या कालावधीत मुख्य अभियंता पद रिक्त होते. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अधीक्षक अभियंता, गोंदिया यांचेकडे दि. ३१.१२.२०१७ ते दि. २८.०२.२०१८ या कालावधीत व

अधीक्षक अभियंता, भंडारा यांचेकडे दि.०१.०३.२०१८ ते दि. ०१.०७.२०१८ या कालावधीत सोपविण्यात आला होता. गोंदिया परिमंडळासाठी नियमित मुख्य अभियंता दि. ०२.०७.२०१८ रोजी नियुक्त करण्यात आले आहेत.

उपरोक्त मुख्य अभियंत्यांची पदे रिक्त असताना इतर अधिकाऱ्यांकडे पदभार सोपविण्यात आल्यामुळे कामावर विपरित परिणाम झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) वादळी पावसामुळे विद्युत यंत्रणेत बिघाड झाल्यावर उपविभागीय अधिकारी तसेच महावितरणच्या वीज वितरण केंद्रातील अधिकारी आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांनी खंडीत वीज पुरवठा त्वरीत पूर्ववत केला. उपरोक्त मुख्य अभियंत्यांची पदे रिक्त असल्याचा कामावर विपरित परिणाम झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) अमरावती, अकोला व गोंदिया परिमंडळातील पदे भरण्यात आली आहेत.

---

## वाशिम जिल्हयातील केंद्र शासन पुरस्कृत योजनांतर्गत लाभार्थ्यांचे प्रस्ताव फेटाळण्यात आल्याबाबत

**(४८) १२३४६० (०२-०८-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत योजनेंतर्गत इंदीरा गांधी, राष्ट्रीय वृध्दापकाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विकलांग योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनेमध्ये शासनाच्या धोरणानूसार सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापनप्रणाली अंतर्गत लाभार्थीच्या थेट बँक खात्यात शासनाकडूनच अनुदान जमा करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशीम जिल्हयातील १९ हजार १९७ लाभार्थीपैकी १३ हजार ५८६ लाभार्थीचे प्रस्ताव फेटाळण्यात आल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन सर्व लाभार्थीना लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळकोट (जि.लातूर) तालुक्यात महावितरणचे उपविभागीय कार्यालयाची स्थापना करण्याबाबत.**

**(४९) १२३६४४ (२८-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यात महावितरणने उपविभागीय कार्यालयाची स्थापना केली नसल्याचे माहे मे, २०१८ च्या दुस-या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळकोट तालुक्यातील लोकांना महावितरणच्या कामासाठी ३० कि.मी. जावे लागत असून लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुका वगळून इतर सर्व तालुक्यात महावितरणचे उपविभागीय कार्यालय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळकोट तालुक्यात महावितरणचे उपविभागीय कार्यालय कधीपर्यंत सुरु करण्यात येणार आहे व या अनुषांगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-१०-२०१८) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) महावितरण कंपनीकडे सद्य:स्थितीत नवीन कार्यालय निर्मितीची मानंके व कर्मचारी / ग्राहक मानंके पुनर्विलोकनाची कार्यवाही चालू आहे. नवीन कार्यालय निर्मितीची मानके व कर्मचारी/ ग्राहक मानके यांच्या पुनर्निश्चितीनंतर, लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यात महावितरण कंपनीचे उपविभागीय कार्यालय निर्मिती संदर्भातील आर्थिक दायित्व विचारात घेऊन योग्य निर्णय महावितरण कंपनीकडून घेण्यात येईल.

---

**अमरावती जिल्हयातील धान्य खरेदी विक्री संस्थाचे शासकीय धान्य खरेदी योजनेतील अडचणींचे निवारण करण्याबाबत**

**(५०) १२४१६४ (०२-०८-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील धान्य खरेदी विक्री संस्थाचे शासकीय धान्य खरेदी योजनेतील अडचणींचे निवारण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चाैकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धान्य खरेदी योजनेतील अडचणींचे निवारण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१८) :** (१) व (२) अॅड. यशोमती ठाकूर, विधानसभा सदस्या यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना दिलेल्या दिनांक २३/४/२०१८ रोजीच्या पत्रातील निवेदनाच्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील १२ खरेदी विक्री सहकारी संस्थांना हंगाम २०१६-१७ मधील खरेदीचे दिलेले कमिशन (रुपये ३.४८ कोटी) व खरेदी खर्चापोटी दिलेला अॅडव्हान्स (रुपये २.६३ कोटी) तसेच हंगाम २०१७-१८ मधील खरेदी खर्चापोटी दिलेला अॅडव्हान्स (रुपये ८३ लाख) अशी एकूण रुपये ६.९४ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.